**भारतीय रिझर्व्ह बँक**

**RESERVE BANK OF INDIA**

www.rbi.org.in

आरबीआय/2021-22/23

डीओआर.एससी.आरईसी.7/21.02.067/2021-22 एप्रिल 22, 2021

सर्व वाणिज्य बँका आणि सहकारी बँका,

महोदय/महोदया,

**बँकांद्वारे डिव्हिडंडची घोषणा**

कृपया आमचे परिपत्रक डीओआर.बीपी.बीसी.क्र.29/21.02.067/2020-21 दि. डिसेंबर 4, 2020 व ह्या विषयावरील इतर संबंधित परिपत्रकांचा संदर्भ घ्यावा.

(2) देशामधील कोविड-19 च्या सुरु असलेल्या दुस-या लाटेमुळे निर्माण झालेली अनिश्चितता विचारात घेता, बँकांनी स्थितिस्थापक राहणे व अनपेक्षित तोट्यांविरुध्दची तटबंदी म्हणून भांडवल उभे करणे व ते जतन करुन ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्यासाठी इक्विटी शेअर्सवर डिव्हिडंड देण्यास बँकांना परवानगी देत असताना, मार्च 31, 2021 रोजी संपणा-या वर्षासाठी डिव्हिडंड घोषित करण्यासाठीच्या नॉर्म्सचे पुनरावलोकन करावयाचे खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहे :-

**वाणिज्य बँका**

(3) परिपत्रक परिपत्रक डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.88/21.02.067/2004-05 मे 4, 2005, च्या सूचनांमधील अंशतः बदलांनुसार, मार्च 31, 2021 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठीच्या नफ्यामधून बँका, इक्विटी शेअर्सवर डिव्हिडंड देऊ शकतात - मात्र अशा डिव्हिडंडचा भाग हा, वरील परिपत्रकाच्या परिच्छेद 4 मध्ये विहित केलेल्या डिव्हिडंड पेआऊट रेशोनुसार निश्चित केलेल्या रकमेच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक नसावा. मे 4, 2005 रोजीच्या परिपत्रकातील इतर सूचनांमध्ये कोणताही बदल नाही.

**सहकारी बँका**

(4) मार्च 31, 2021 रोजी संपणा-या वित्तीय वर्षाच्या नफ्यामधून, इक्विटी शेअर्सवर विद्यमान सूचनांनुसार डिव्हिडंड देण्याची परवानगी सहकारी बँकांना असेल.

**सर्वसाधारण**

(5) डिव्हिडंड प्रदान केल्यानंतर, लागु असलेल्या किमान विनियामक भांडवली आवश्यकता पूर्ण करणे सर्व बँका सुरुच ठेवतील. इक्विटी शेअर्सवरील डिव्हिडंड घोषित करताना, आर्थिक परिस्थिती व लाभक्षमता विचारात घेऊन, लागु असलेल्या भांडवली आवश्यकता व तरतुदींचा पुरतेपणा (अॅडेक्वसी) च्या तुलनेत, विद्‌यमान व प्रक्षेपित बँक भांडवलाची स्थिती विचारात घेण्याची जबाबदारी संचालक मंडळाची असेल.

आपली विश्वासु,

(उषा जानकीरामन)
मुख्य महाव्यवस्थापक